# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क.२५६५१४३ फॅक्स कं. ०७१२—२५६१६६३

E-mail:ronagpur.dte@gmail.com Web:- rdtenagpur.org.in

क्रमांक :—तंशिस/प्राकाना/शैवि२/अंतिम मान्यता /२०१२/ 3885

दि.:— 31 DEC 2012

प्रति,
प्राचार्य,
सर्व अनुदानित/ विनाअनुदानित अभियांत्रिकी/ व
औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था.

विषय:— शैक्षणिक वर्ष २०१२—१३ मध्ये नवीन पदविका अभ्यासक्रम , प्रवेशक्षमता वाढ, पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये पदविका अभ्यासक्रमाची सेकंडशिफट इ. यांना संचालनालयाची अंतिम मान्यता घेण्यांबाबत.

संदर्भ :— १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क. १०/एनजीपी/अंतिम मान्यता/२०१२/८८४, दि. २१/०८/२०१२.
२) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क. १०/एनजीपी/अंतिम मान्यता/२०१२/८८४, दि. २६/११/२०१२.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन पत्रान्वये कळविण्यांत येते की, ज्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१२—२०१३ मध्ये पदविका अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम , प्रवेशक्षमतावाढ, पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये पदविका अभ्यासक्रमाची सेकंडशिफट सुरु करण्यांस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, दिल्ली तसेच शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे. अशा काही संस्थांनी सदर अभ्यासक्रमांस अद्यापपर्यंत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाची अंतिम मान्यता घेतलेली नाही. अशा संस्था/संबंधित अभ्यासक्रम संबंधात कार्यवाही हेतूने सूचना देण्यांत आलेल्या आहेत, तथापी, असे निदर्शनास आले आहे की, अद्यापही काही संस्थानी अंतिम मान्यता घेण्यांबाबत संचालनालय कार्यालयाकडे संपर्क साधलेला नाही. तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन संचालनालयाचे अंतिम आदेश घेतलेले नाही.

तरी, सर्व संस्थांना पुन:श्च सूचीत करण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१२—१३ मध्ये विद्यार्थी प्रवेशित केलेले असल्यास सदर प्रवेश अनाधिकृत प्रवेश समजण्यांत येईल. तसेच सदर अनाधिकृत प्रवेशाबाबत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यांत येईल, सदर कार्यवाहीस संबंधित संस्था जबाबदार राहील. तसेच पुढे असेही नमूद करण्यात येते की, अशा संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०१२—१३ मधील सदर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्यास मान्यता देण्यांत येणार नाही, याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.

प्रत:— उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परिक्षा मंडळ, नागपूर यांना माहितीकरिता.
२. प्रोग्रामर , हेच कार्यालय, यांना सदरचे पत्र संकेत स्थळावर प्रकाशित करण्यांकरिता.